दैनिक समर्थ
दिलासा

शुक्रवार, दि. ११ नोव्हेंबर २०१६ पान नं. ४

## सेलूतील सॉफ्टबॉल स्पर्धेत लातूर विजेता

सेलू, दि.१० (प्रतिनिधी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व नूतन महाविद्यालय सेलू यांच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी आंतरमहाविद्यालयन सॉफ्टबॉल स्पर्धा नूतन महाविद्यालय सेलू क्रीडागंणावर प्रारंभ झाली. साखळी फेरीत राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर संघाने ०६ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकाविला. नूतन महाविद्यालय संघाने ०५ गुणसह व्दितीय, शिवाजी महाविद्यालय परभणी ०३ गुणासह तृतीय क्रमांक पटकावला. पंच म्हणून अनिरुद्ध खोत, गणेश दिक्षित, श्रीकांत प्रांडे, श्रीकांत शिर्के, अविनाश आघाव, अंगद सुतारे यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण सोहळ्यास प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, प्रा. यु.डी. इगळे, प्रा. उमाकांत हेसे, प्रा. गोविंद कदम, प्रा. बी.डी. बल्लाळ, प्रा. करंजकर, प्रा. गणेश मनोरे, प्रा. गोविंद वाकणकर , प्रा. के. के. कदम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.संतोष कोकीळ यांनी तर आभार प्रा.नागेश कान्हेकर यांनी मानले. स्पर्धेत लातूर, उदगीर, परभणी, सेलू संघाचा समावेश होता. स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शना खाली प्रा.के.के. कदम, प्रा. नागेश कान्हेकर, डी. डी. सोन्नेकर, गणेश माळवे, संतोष शिंदे, प्रा. बैगंवाड, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.